# व्यंकटेश माडगूळकरांचा अक्षर प्रवास

- डॉ. बाळकृष्णजी कानोळकर

व्यंकटेश माडगूळकर हे मराठी साहित्य विश्वातले एक मोठे नाव. मराठी नवकथेच्या प्रवर्तकापैकी एक. ग्रामीण मराठी कथेचे आद्य प्रवर्तक म्हणूनही काही समीक्षकांनी त्यांचा गौरव केलेला आहे. त्यांचे साहित्य हे विविधांगी व विविध रुपिणी आहे. केवळ मराठी साहित्यालाच रुप आणि आकार देण्याचे कार्य त्यांनी केले असे नसून एकूणच भारतीय साहित्याच्या जडणघडणीत त्यांचा मोठा सहभाग आहे. त्यांचे विविध प्रकारचे साहित्य अनेक भारतीय भाषांमधून अनुवादित झालेले आहे. आणि म्हणून त्यांना भारतीय साहित्याचे शिल्पकार म्हणणे सार्थ ठरणारे आहे. भारतीय साहित्य अकादमीनेही त्यांच्या 'सत्तांतर' या कादंबरीला पुरस्कार देऊन गौरविलेले आहे. अशा या साहित्यिकाचा लेखक म्हणून प्रवास कसा, कुठे व कधी सुरू झाला आणि पुढच्या प्रवासात त्याने कोणकोणते टप्पे घेतले कोणती वळणे घेतली ते पहाणे मोठे उद्बोधक ठरेल.

व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्यिक प्रवासाचा माग काढला तर तो माडगूळ - कोल्हापूर-पुणे-मुंबई-पुणे असा झालेला दिसून येतो. आपल्या या प्रवासाला १९४६ मध्ये आपल्या जन्मगावापासूनच त्यांनी प्रारंभ केला. माडगूळ मध्ये असतानाच त्यांनी आपली पहिली कथा लिहिली. 'काळ्या तोंडाची'. बडोद्याहून प्रकाशित होणाऱ्या पुरुषोत्तम चित्रे यांच्या 'अभिरुची' या मराठीतील प्रतिष्ठित मासिकातून ती जुलै १९४६ च्या अंकातून प्रसिध्द झाली. आणि मराठीत एका नव्याच कथापर्वाचा प्रारंभ झाला. त्यानंतर पुढे आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते लिहित राहिले. सुमारे साठेक वर्षांच्या त्यांच्या या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांच्या साहित्यातला ताजेपणा, कस आणि स्वत्वसंपन्नता टिकून राहिली आहे. त्याचप्रमाणे जाणकार वाचक आणि अभ्यासक यांची त्यांच्या लेखनाविषयीची आस्था, कुतूहल आणि उत्सुकता देखील अजून मावळलेली नाही. अजूनही त्यांच्या पुस्तकांच्या नवनवीन आवृत्त्या सातत्याने निघत आहेत, अजूनही त्यांच्या साहित्याचे देशीविदेशी भाषांमधून अनुवाद, भाषांतरे होत आहेत ही गोष्ट लक्षणीय म्हणावी लागेल.

या सर्व बाबी जमेस धरूनही वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीने विचार करू जाता १९४५ ते १९७५ हाच त्यांच्या साहित्यिक कर्तृत्वाचा उत्तुंग कालखंड होय. आणि याच काळाचे ते प्रातिनिधिक साहित्यिक.

माडगूळकरांनी कथालेखनाने आपल्या साहित्यिक कारकिर्दीचा प्रारंभ केला असला तरी पुढे त्यांनी चोरघडेप्रमाणे तोच एक साहित्यप्रकार धरून ठेवला असे नाही. व्यक्तिचित्र, कादंबरी, नाटक, लोकनाट्य, आत्मकथन, प्रवासवर्णन, वन्यजीवनपर आणि इतर ललित गद्य आणि अपवाद म्हणता येतील इतक्या चार-दोन कविता असे विविध प्रकारचे साहित्य त्यांनी लिहिले. काही चित्रपटांसाठी कथा, पटकथा, संवाद लेखनाचे कामही त्यांनी केले. तसेच काही चित्रपटातून भूमिकाही केल्या. जेव्हा ते लिहित नसत तेव्हा ते कोऱ्या कागदावर आरेखने करत किंवा कॅनव्हासवर रंग लावित बसत, असे त्यांनीच एके ठिकाणी सांगितलेले आहे. 'काळी आई', 'जांभळाचे दिवस', 'गावाकडच्या गोष्टी', 'बाझार', 'वाटा' हे काही

त्यांचे प्रसिध्द कथासंग्रह. सुमारे दिडशे कथा त्यांनी लिहिल्या.

त्यांच्या या अनेकविध प्रकारातील निर्मितीमधून आढळून येणाऱ्या जीवनजाणिवा, कलाजाणिवा तसेच शैलीविशेषण इत्यादी दृष्टीनी त्यांतील आंतरिक संगतीचा शोध घेण्यासारखा आहे. 'काळ्या तोंडाची' ही त्यांची कथा एका कुत्रीची आहे. कथेचे निवेदन तिचेच असून ते सातारी बोलीत म्हणजेच माणदेशी बोलीत आहे. या संबंधात माडगूळकरांनी काढलेले उद्‌गार मार्मिक आहेत. ते म्हणतात, 'माणदेशातले कुत्रेसुध्दा हीच भाषा बोलणार असे मला वाटले.'

आपल्या आयुष्याच्या पहिल्या वीस वर्षात कोल्हापूर, कुंडलं आणि किर्लोस्करवाडी सोडल्यास आपले गाव आणि पंचक्रोशी सोडून ते कुठे फारसे गेले नाहीत. पण या पंचक्रोशीच्या मर्यादितच त्यांनी खूप काही अनुभवले. माणदेशाच्या भूमीत लहानाचे मोठे होताना तिथली माणसे, निसर्ग, पशुपक्षी, तिथली जीवनसंस्कृती, दैव्यदारिद्र यांच्या अनुभवांचे, संस्कारांचे संचित म्हणजे त्यांचा हा साहित्य प्रवास. प्राचीन आणि देशी-विदेशी आधुनिक साहित्याचे संस्कार आणि त्याचा बरोबरीनेच मौखिक परंपरेतून, पारंपारिक प्रयोग प्रवण कलाप्रकारांतून अनुभवलेल्या वाङ्मयाचे संस्कारदेखील त्यांच्या साहित्यिक जडणघडणीत झालेले आहेत.

'माणदेशी माणसे', 'मौज' मधून प्रथम प्रकाशित झाली. त्यात आणखी एक-दोन माणसांची भर घालून पुढे ती पुस्तक रुपाने प्रकाशित झाली. १९४८-४९ ची ही गोष्ट. ह्या 'माणसां'नी माडगूळकरांना मोठा नावलौकिक मिळवून दिला. पुढे 'बनगरवाडी' ही कादंबरी मौजनच प्रकाशित केली. 'लेंगरवाडी' हे तिचं मुळातलं शीर्षक ते नंतर बदलून 'बनगरवाडी' केलं. या कादंबरीने अफाट लोकप्रियता माडगूळकरांना मिळवून दिली. इंग्रजीतून तिचे भाषांतर झाले. 'दि व्हिलेज हॅड नो वॉल्स', लाख-दीड लाख प्रतींची आवृत्ती काढण्यात आली. देशी भाषेतूनही तिची भाषांतरे झाली. नंतर 'वावटळ', 'सत्तांतर', या कादंबऱ्याही गाजल्या.

माडगूळकरांनी नाटकेही लिहिली आहेत. आणि चांगली लिहिली आहेत. नव्या मराठी रंगभूमीच्या जडणघडणीत त्यांचाही वाटा आहे. 'तू वेडा कुंभार', 'पती गेले ग काठेवाडी', 'सती' यांसारख्या नाटकांनी त्यांना नाटककार म्हणून नाव मिळवून दिले परंतु त्यांचा लौकीक झाला नाही.

कथा, कादंबरी, व्यक्तिचित्र आणि नाटक ह्या सर्वच साहित्य प्रकारांतून माडगूळकरांनी काही नवे करण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला आहे. त्यांना त्यात यशही प्राप्त झाले. 'बनगरवाडी', 'वावटळ', 'सत्तांतर', 'माणदेशी माणसं', 'सती' या सारख्या सकस कलाकृती या प्रयत्नातून निर्माण झाल्या. त्यांनी मराठी तसेच भारतीय साहित्याची ओळख जगाला करून दिली. परंतु असे असले तरी माडगूळकरांकडे जेव्हा एखादा वाचक वा समीक्षक पाहतो तेव्हा एक कथाकार, एक नवकथाकार म्हणूनच पहात असतो.

माडगूळ-कोल्हापूर-पुणे-मुंबई आणि पुणे ह्या त्यांच्या जीवन प्रवासाच्या बरोबरीनेच त्यांचा साहित्य प्रवासही निगडित आहे. मुंबईने त्यांच्या साहित्यातील वास्तवचित्रणाला अधिक धारदार बनवले पण बिघडवले नाही. माडगूळच्या - माणगावच्या मातीचा गंध त्यांच्या सर्वच साहित्यातून दरवळताना जाणवतो.

❖ ❖ ❖